सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website**: www.jdroamt.org
**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२५/ 3478
दिनांक :- 26 DEC 2025

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अनुदानित/विना-अनुदानित
अभियांत्रिकी पदविका/पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत.**

**संदर्भ :-** मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. DTE-D170TEQP/212/2025-DESK17 दिनांक २२/१२/२०२५.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की,मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ८/१२/२०२५ रोजी नागपूर येथील विधानभवनात संचालक, तंत्रशिक्षण यांच्या समवेत संचालनालयातील प्रलंबित विषयांच्या अनुषंगाने चर्चा बैठक आयोजित करण्यात आली होती. झालेल्या बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडण्यात येत असून त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर बैठकीमध्ये सोलार टेक्नालॉजीचा वाढता वापर लक्षात घेता सोलार उपकरणांची उभारणी, देखभाल व दुरुस्ती यासाठी कुशल मनुषबळाची आवश्यकता मोठया प्रमाणात वाढत आहे. या पार्श्वभूमीवर सोलार टेक्नालॉजी ॲण्ड मेन्टेन्सस हा अभ्यासक्रम पदवी व पदविका अभ्यासक्रमात समाविष्ट केल्यास विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख तांत्रिक कौशल्ये प्राप्त होतील. तसेच पदवी / पदविका विद्यार्थ्याकरिता जर्मनी, जपान, रशिया या भाषांचे प्रशिक्षण देण्याबाबत संबंधित अभ्यासगटाशी समन्वय साधावा व त्यानुसार आपल्या संस्थेत सदर अभ्यासक्रमांचा समावेश करण्याकरीता आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**सहपत्र :-** वरिलप्रमाणे.

(डॉ. व्हि. आर. मानकर)
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती

**प्रत :-** प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४९/४६६/४१९
ई-मेल–desk17@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक : DTEM-D170TEQP/212/2025-DESK17 दिनांक : २२ डिसेंबर, २०२५

प्रति,
**मा. कुलगुरु,**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे
२) मुंबई विद्यापीठ, मुंबई
३) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
४) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
५) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
६) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
७) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
८) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
१०) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
११) कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
१२) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
१३) रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई
१४) सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे

**विषय:** **मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत.**

**संदर्भ:** शासन पत्र क्र. बैठक-२०२५/प्र.क्र.७७२/तांशि-४, दिनांक १९/१२/२०२५.

मा. महोदय,

मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०८/१२/२०२५ रोजी नागपूर येथील विधानभवनात संचालक, तंत्रशिक्षण यांच्या समवेत संचालनालयातील प्रलंबित विषयांच्या अनुषंगाने चर्चा बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्ततील खालील मुद्यांच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश मा. मंत्री महोदयांनी दिलेले आहेत.

| अ.क्र | इतिवृत्तातील मुद्या क्रमांक | विषय | मा. मंत्री महोदय यांचे निर्देश |
|---|---|---|---|
| १ | ६ | सोलार टेक्नॉलॉजीच्या अनुषंगाने अभ्यासक्रम तयार करणे. | सोलार टेक्नॉलॉजीचा वाढता वापर लक्षात घेता सोलार उपकरणे बसविणे, सोलार उपकरणांचे देखभाल व दुरुस्ती याकरिता लागणारे मनुष्यबळ राज्यात अत्यल्प प्रमाणात उपलब्ध आहे. अशा प्रकारचे कुशल मनुष्यबळ वाढविण्याकरिता "सोलार टेक्नॉलॉजी अॅन्ड मेंटेनेन्स" हा अभ्यासक्रम पदवी व पदविका अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचे निर्देश आहेत. |
| २ | ७ | पदवी/पदविका विद्यार्थ्यांकरिता जर्मनी/जपान/रशिया या | पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना विदेशात नोकरीची संधी उपलब्ध होण्याकरिता संबंधित देशातील भाषेचे तसेच संस्कृतीचे ज्ञान असणे अत्यावश्यक आहे. याकरिता जपान देशाच्या |

| अ.क्र | इतिवृत्तातील मुद्दा क्रमांक | विषय | मा. मंत्री महोदय यांचे निर्देश |
|---|---|---|---|
| | | देशातील भाषांचे प्रशिक्षण | अभ्यासगटाने जपानी भाषेचे व संस्कृतीचे प्रशिक्षण देण्याचे मान्य केले असून, सदर प्रशिक्षणानंतर परीक्षा घेऊन उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व नोकरीची संधी देण्यात मदत करण्याचे मान्य केले. त्याअनुषंगाने पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना जर्मनी, जपान, रशिया या देशातील भाषांचे प्रशिक्षण देण्याच्या अनुषंगाने तात्काळ संबंधित अभ्यासगटांशी समन्वय साधून हे प्रशिक्षण अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचे निर्देश आहेत. |

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने येथे नमूद करण्यात येते की, सोलार टेक्नॉलॉजीचा वाढता वापर लक्षात घेता सोलार उपकरणांची उभारणी, देखभाल व दुरुस्ती यासाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या पार्श्वभूमीवर "सोलार टेक्नॉलॉजी अॅन्ड मेंटेनन्स" हा अभ्यासक्रम पदवी व पदविका अभ्यासक्रमात समाविष्ट केल्यास विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख तांत्रिक कौशल्ये प्राप्त होतील, सोलार प्रकल्पांची कार्यक्षमता वाढेल तसेच रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. सदर अभ्यासक्रम नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातील तांत्रिक गरजा पूर्ण करण्यास उपयुक्त ठरेल व देशाच्या शाश्वत ऊर्जा धोरणांना बळकटी देईल.

तसेच, पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना विदेशात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जर्मनी, जपान व रशिया या देशांतील भाषांचे प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. या देशांमध्ये अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची मोठी मागणी असून स्थानिक भाषेचे मूलभूत ज्ञान असल्यास रोजगाराच्या संधी लक्षणीयरीत्या वाढतात. भाषा प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय कामकाज संस्कृतीशी जुळवून घेण्याची क्षमता, संवाद कौशल्ये व व्यावसायिक आत्मविश्वास वाढतो.

त्याअनुषंगाने, आपणांस विनंती करण्यात येते की, सर्व अभियांत्रिकी पदवी तसेच पदविका अभ्यासक्रमांमध्ये वरील विषयांचा समावेश पदवी व पदविका अभ्यासक्रमात करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यांत यावी.

आपला,

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : माहितीसाठी.

१. मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२

प्रत : माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी :

१. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये, छत्रपती संभाजीनगर/नाशिक/नागपूर/अमरावती. त्यांना कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व अभियांत्रिकी पदवी तसेच पदविका तसेच स्वायत्त संस्थांना पत्रात नमूद विषयांशी संबंधित अभ्यासक्रम संस्थेत सुरू करण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही/ संबंधित विद्यापिठाकडे याबाबत पाठपुरावा करण्याबाबत सूचित करावे.

२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, वांद्रे, मुंबई. त्यांना कळविण्यांत येते की, सर्व पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये वरील विषयांशी संबंधित अभ्यासक्रम सुरू करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

३. कार्यासन क्रमांक २ व १०, मु.का., मुंबई

## मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०८ डिसेंबर, २०२५ रोजी विधानभवन, नागपूर येथे तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथील विविध प्रलंबीत विषयांच्या अनुषंगाने झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

सोमवार, दिनांक ०८ डिसेंबर, २०२५ रोजी विधानभवन, नागपूर येथे मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई येथील विविध प्रलंबीत विषयांच्या अनुषंगाने बैठक आयोजीत करण्यात आली होती. या बैठकीस श्री. वेणुगोपाल रेड्डी, अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, श्री. खोरगडे, सहसचिव, तंत्रशिक्षण, श्री. मोहितकर, संचालक, तंत्रशिक्षण, व श्री. नाईक,संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई इ. अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीत मा. मंत्री महोदयांनी खालीलप्रमाणे निर्देश दिले :-

१. शिष्यवृत्ती :-

तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांच्या अधिपत्याखालील संस्थामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वेळेवर मिळत नसल्याबाबत विविध स्तरावरुन तक्रारी होत आहेत. याकरिता मा. मुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशानुसार शिष्यवृत्तीचा खर्च हा कार्यक्रम खर्चात न दाखविता तो अनिवार्य खर्चात दाखविण्याबाबत आवश्यक तो प्रस्ताव पुढील १५ दिवसांत मा. मुख्यमंत्री महोदयाकडे सादर करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश अ.मु.स. यांना देण्यात आले.

२. DTE/ARA शिष्यवृत्ती पोर्टल :-

तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांच्या अधिपत्याखालील संस्थामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना MAHADBT पोर्टलवर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीकरिता प्रवेश घेतल्यानंतर स्वतंत्र अर्ज दाखल करावा लागतो. ARA पोर्टलवर प्रवेशित विद्यार्थ्यांना स्वतंत्र अर्ज करावा लागू नये याकरिता MAHADBT यांचेशी समन्वय साधून ARA पोर्टलवरुन सदर विद्यार्थ्यांचा डाटा स्वयंचलनाने MAHADBT पोर्टलवर जाऊन विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज दाखल होतील, अशाप्रकारे संगणकीय प्रणाली (पोर्टल) पुढील एका महिन्यात तयार करण्यात यावी असे निर्देश देण्यात आले.

३. बीबीए/बीसीए/बीएमएस एन.आर.आय. विद्यार्थ्यांसाठी अधिसंख्य जागा :-

तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांच्या अधिपत्याखालील बीबीए, बीसीए, बीएमएस संस्थामध्ये एन.आर.आय. विद्यार्थी प्रवेशाकरिता मोठ्या प्रमाणात मागणी करीत असल्याचे निदर्शनास आले असल्याने अशा संस्थांचा आढावा घेऊन याबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्याकडे एन.आर.आय. विद्यार्थी प्रवेशाकरिता अधिसंख्य जागांची मागणी करणारे पत्र संचालक, तंत्रशिक्षण यांनी अग्रेषित करण्यातबाबत निर्देश देण्यात आले.

४. सी.एच.बी पोर्टल:-

तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांच्या अधिपत्याखालील संस्थामध्ये तासिका तत्वावरील अध्यापकांची नियुक्ती करण्यात येते. सदर तासिका तत्वावरील अधिव्याख्याता/प्राध्यापक यांचेकरिता त्यांचे नियुक्ती,हजेरी व वेतन यासंदर्भात एन्ड टू एन्ड एक पोर्टल तयार करण्यात यावे असे निर्देश वेळोवेळी मंत्री महोदयांनी दिले होते. परंतु, अद्याप सदर पोर्टल तयार करण्यात न आल्याने मा.मंत्री महोदयांनी नाराजी व्यक्त करुन पुढील १५ दिवसांत सदर पोर्टल कार्यान्वीत करण्याचे निर्देश अप्पर मुख्य सचिव यांना दिले.

५. Third Party Audit/ Counsulatancy इ. विषयांकरिता प्राध्यापक/अधिव्याख्याता यांचेकरिता समरुप धोरण बनविणे:-

Third Party Audit/ Counsulatancy इ. काही अतिरिक्त कामाचे प्राध्यापक/अधिव्याख्याता यांना विविध प्रकारचे मानधन मिळते. याबाबत शासकीय/अशासकीय अनुदानित/शासकीय स्वायत्त तंत्रनिकेतने तसेच शासकीय/शासकीय स्वायत्त/अशासकीय अनुदानिकत अभियांत्रिकी संस्थामध्ये मानधनाच्या वाटपाकरिता समरुप धोरण नाही. तसेच मानधनाच्या वाटपात अनियमितता झाल्याचे मान्य करुन हेतुपूरस्सर संचालक, तंत्रशिक्षण यांनी काही निवडक संस्थांनाच वसुलीच्या नोटीस पाठविल्याच्या व त्याअनुषंगाने काही तक्रारदार न्यायालयात गेल्याने संबंधित अधिव्याख्याता/ प्राध्यापक/प्राचार्यांवर फौजदारी गुन्हे दाखल झाल्याच्या तक्रारी मा. मंत्री महोदयांकडे प्राप्त झाल्या आहेत.

सदर तक्रारींच्या अनुषंगाने शासकीय/अशासकीय अनुदानित/शासकीय स्वायत्त तंत्रनिकेतने तसेच शासकीय/शासकीय स्वायत्त/अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी संस्थांमध्ये Third Party Audit/ Counsulatancy इ. अतिरिक्त कामांच्या मानधनाच्या वाटपाकरिता सद्यस्थितीतील धोरणांचा तुलनात्मक तक्ता करुन पुढील ०८ दिवसांच्या आत मा. मंत्री महोदयांकडे सादर करण्यात यावा असे निर्देश अप्पर मुख्य सचिव यांना देण्यात आले.

तसेच, मानधनाच्या वाटपात अनियमितता झाल्याचे मान्य करुन हेतुपूरस्सर संचालक, तंत्रशिक्षण यांनी काही निवडक संस्थांनाच वसुलीच्या नोटीस पाठविल्याच्या तक्रारींच्या अनुषंगाने देखील आढावा घेऊन किती संस्थांना नोटीस पाठविण्यात आल्यात, किती संस्थांना नोटीस पाठवावयाच्या आहेत या अनुषंगाने किती वसुली करण्यात आली या मुद्यांच्या अप्पर मुख्य सचिव यांनी आढावा घेऊन संस्थानिहाय अहवाल पुढील ०८ दिवसांच्या आत मा. मंत्री महोदयांकडे स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सादर करावा, असे निर्देश अप्पर मुख्य सचिव यांना देण्यात आले.

६. सोलार टेक्नॉलॉजीच्या अनुषंगाने अभ्यासक्रम तयार करणे:-

सोलार टेक्नॉलॉजीचा वाढता वापर लक्षात घेता या सोलार उपकरणे बसविणे, सोलार उपकरणांचे देखभाल व दुरुस्ती याकरिता लागणारे मनुष्यबळ राज्यात अत्यल्प प्रमाणात उपलब्ध आहे. अशा प्रकारचे कुशल मनुष्यबळ वाढविण्याकरिता सोलार टेक्नॉलॉजी ॲन्ड मेंटेनन्स हा अभ्यासक्रम पदवी व पदविका अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात यावा, असे निर्देश संचालक, तंत्रशिक्षण यांना देण्यात आले.

७. पदवी/पदविका विद्यार्थ्यांकरिता जर्मनी/जपान/रशिया या देशातील भाषाचे प्रशिक्षण:-

पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना विदेशात नोकरीची संधी उपलब्ध होण्याकरिता संबंधित देशातील भाषेचे तसेच संस्कृतीचे ज्ञान असणे अत्यावश्यक आहे. याकरिता जपान देशाच्या अभ्यासगटाने जपानी भाषेचे व संस्कृतीचे प्रशिक्षण देण्याचे मान्य केले असून सदर प्रशिक्षणानंतर परीक्षा घेऊन उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व नोकरीची संधी देण्यात मदत करण्याचे मान्य केले. त्याअनुषंगाने पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना जर्मनी,जपान,रशिया या देशातील भाषाचे प्रशिक्षण देण्याच्या अनुषंगाने तात्काळ संबंधित अभ्यासगटांशी समन्वय साधून हे प्रशिक्षण अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यासंदर्भात निर्देश देण्यात आले

८. शासकीय अभि. महा. चंद्रपुर येथे तयार करण्यात आलेल्या डिजीटल स्मार्ट रिडींग झोन प्रमाणे इतर अभियांत्रिकी व तंत्रनिकेतनांमध्ये हा प्रकल्प राबविणेबाबत :-

शासकीय अभि. महा. चंद्रपुर येथे तयार करण्यात आलेल्या डिजीटल स्मार्ट रिडींग झोन विद्यार्थ्यांकरिता अत्यंत उपयुक्त असून इतर अभियांत्रिकी व तंत्रनिकेतनांमध्ये हा प्रकल्प तात्काळ राबविण्याबाबत संचालक, तंत्रशिक्षण यांना निर्देश देण्यात आले.

९. तंत्रशिक्षण संचालनालयाचे विदेश शिक्षण शिष्यवृत्ती व विदेशी विद्यापीठांकरिता पोर्टल तयार करणे :-

तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत विदेशात शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना केवळ ४० मुलांना शिष्यवृत्ती देण्यात येते. तसेच, विद्यार्थ्यांना विदेशातील शिक्षणाच्या संधी उपलब्ध होण्याकरिता विविधि अडचणी येत असतात. याधर्तीवर विद्यार्थ्यांच्या सोईकरिता ज्या विद्यार्थ्यांना विदेशात शिक्षण घ्यावयाचे आहे त्यांचेकरिता एक पोर्टल तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत तयार करुन देण्यात यावेत. सदर पोर्टलवर विदेशी विद्यापीठांची सशुल्क नोंदणी करुन विद्यार्थ्यांना सीईटी पोर्टलवरुनच या विद्यापीठांमध्ये प्रवेश घेता येईल अशाप्रकारची प्रणाली पुढील ०३ महिन्यात तयार करण्यात यावी, असे निर्देश अतिरिक्त मुख्य सचिव यांना देण्यात आले.

१०. फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना राज्यातील बृहत आराखड्याची माहिती देणे :-

राज्यात शैक्षणिक पातळीचा दर्जा उंचावण्यासाठी व विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळण्याकरिता राज्यात फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या मान्यतेने सुरु होणाऱ्या फार्मसी व अभियांत्रिकी महाविद्यालयांचा बृहत आराखडा तयार करण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी व याबाबतची माहिती फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना कळविण्यात यावी, असे निर्देश अतिरिक्त मुख्य सचिव यांना देण्यात आले.

११. राज्यातील शासकीय स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयांचे ऑडीट करणेबाबत :-

राज्यातील शासकीय स्वायत्त, अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये अत्यंत मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमितता होत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्याने त्यांचे ऑडीट शासनाच्या पॅनलमार्फत करण्यात यावे आणि याबाबतचा अहवाल ६० दिवसांत सादर करण्याबाबत मा. मंत्री महोदयांनी ०६ महिन्यापुर्वी निर्देश देऊन देखील याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याने मा. मंत्री महोदयांनी अत्यंत नाराजी व्यक्त केली. सदर महाविद्यालयांचे ऑडीट करणेबाबतचे आदेश पुढील ०८ दिवसांत निर्गमित करुन त्यांचे ऑडीट रिपोर्ट स्वयंस्पष्ट अभिप्रायांसह मा. मंत्री महोदयांना ३० दिवसात सादर करण्याचे निर्देश अतिरिक्त मुख्य सचिव यांना देण्यात आले.

तसेच, सदर महाविद्यालयांच्या BOG चा कालावधी संपुष्टात आल्याने याबाबत पुर्वीच्या BOG ने केलेल्या कामाचा आढावा घेऊन नव्याने BOG नियुक्त करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याबाबत संचालक, तंत्रशिक्षण यांना निर्देश देण्यात आले.

सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

****

## मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०९ डिसेंबर, २०२५ रोजी विधानभवन, नागपूर येथे राज्य सामाईक परीक्षा कक्ष, मुंबई व प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई येथील विविध प्रलंबीत विषयांच्या अनुषंगाने झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

मंगळवार, दिनांक ०९ डिसेंबर, २०२५ रोजी विधानभवन, नागपूर येथे मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सामाईक परीक्षा कक्ष, मुंबई व प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई येथील विविध प्रलंबीत विषयांच्या अनुषंगाने बैठक आयोजीत करण्यात आली होती. या बैठकीस श्री. वेणुगोपाल रेड्डी, अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, श्री. सरदेसाई, आयुक्त, सी.ई.टी. सेल, श्री. बिस्वास, अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई, श्री. खोरगडे, सहसचिव, तंत्रशिक्षण, श्री. मोहितकर, संचालक, तंत्रशिक्षण, व श्री. देवळाणकर,संचालक, उच्च शिक्षण इ. अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीत मा. मंत्री महोदयांनी खालीलप्रमाणे निर्देश दिले :-

❖ सर्वप्रथम प्रदिर्घ काळ प्रलंबीत विषयांचा विहीत कालावधीत निपटारा करण्याकरिता खालील नमुद अधिकाऱ्यांच्या त्रिसदस्यीय कार्यबल गटाची स्थापना करण्यात यावी.

. श्री. दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.,आयुक्त, राज्य सामाईक कक्ष, मुंबई.

. डॉ. विनोद मोहितकर, संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

. डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्चशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई.

कार्यबल गटाने करावयाच्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे विषय निहाय निर्देश मा. मंत्री महोदयांनी दिले.

**1) L.T.C. 3.0 :-**

राज्य सामाईक परीक्षा कक्षामार्फत एकुण २०,००० संगणकांचे LTC सेंटर ०३ टप्प्यांमध्ये उभारण्यास मान्यता देण्यात आली असून त्यापैकी ०२ टप्पे पुर्ण करण्यात आले होते. ०१ ल्या व ०२ ऱ्या टप्प्यांमध्ये शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये एकुण ७२०० संगणक पुरविण्यात आले असून आता ०३ ऱ्या टप्प्यांमध्ये १२८०० संगणक सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी बसविणे प्रस्तावीत आहे. याकरिता जागेची अडचण येत असल्याने ०५ वर्षाच्या भाडेतत्वावर सर्व जिल्ह्यांमध्ये जागा मिळणेकरिता जाहिरात देण्याचे निर्देश या कार्यबल गटाला निर्देश देण्यात आले. जिल्हानिहाय जागेची गरज, संगणकांची गरज याबाबतची तपासणी करुन त्याप्रमाणे याबाबतची RFP एका महिन्यात तयार करुन जाहीर करण्याचे निर्देश कार्यबल गटाला देण्यात आले.

**2) ARA Portal :-**

प्रवेश नियामक प्राधिकरण मुंबई यांचे सध्या प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता End to End पोर्टल तयार करण्याबाबत यावे. यात सर्व विद्यार्थ्यांना आधार आयडी, आपार आयडी अनिवार्य करण्यात यावे. तसेच PWD विद्यार्थ्यांकरिता नव्याने तयार करण्यात आलेला युनिक Disability आयडी देखील अनिवार्य करण्यात यावा. MAHADBT पोर्टलवर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीकरिता प्रवेश घेतल्यानंतर स्वतंत्र अर्ज दाखल करावा लागतो. ARA पोर्टलवर प्रवेशित विद्यार्थ्यांना स्वतंत्र अर्ज करावा लागू नये याकरिता MAHADBT यांचेशी समन्वय साधून ARA पोर्टलवरुन सदर विद्यार्थ्यांचा डाटा स्वयंचलनाने MAHADBT पोर्टलवर जाऊन विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज दाखल होतील, अशाप्रकारे संगणकीय प्रणाली तात्काळ तयार करण्यात यावी व याकरिता RFP एका महिन्यात तयार करुन पुढील कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश कार्यबल गटाला देण्यात आले.

**3) Data Center for CET :-**

राज्य सामाईक परीक्षा विभागाचा विद्यार्थ्यांचा, परीक्षांचा डाटा सुरक्षित ठेवण्याच्या अनुषंगाने डाटा सेंटर तयार करण्यात यावे. त्यात प्रामुख्याने Cloud वरती डाटा ठेवण्याबाबत तसेच उर्वरीत डाटा हार्डडिस्क मध्ये ठेवण्याच्या अनुषंगाने RFP १ महिन्यात तयार करुन जाहीर करण्याचे निर्देश कार्यबल गटाला देण्यात आले.

**4) LTC 1 Additional Work Repairs:-**

राज्य सामाईक कक्षामार्फत पहिल्या टप्प्यामध्ये उभारण्यात आलेल्या ०४ LTC सेंटरमध्ये तंत्रनिकेतनांच्या इमारती अत्यंत नादुरुस्त परिस्थितीत असल्याने LTC सेंटर सुरळीत चालण्याच्या दृष्टीने ०४ इमारतींची डागडुजी व नुतनीकरण करणे अत्यावश्यक आहे. सदर इमारती व डागडुजी Polytechnic Facelifting मध्ये समाविष्ट असल्याने सदर काम महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळामार्फत तात्काळ करण्यात यावे. याकरिता आवश्यक परवानगीचा प्रस्ताव संचालक, तंत्रशिक्षण यांनी तात्काळ शासनास सादर करावा, असे निर्देश देण्यात आले.

**5) LTC 2 Manpower :-**

राज्य सामाईक कक्षामार्फत दुसऱ्या टप्प्यामध्ये उभारण्यात आलेल्या LTC सेंटर सुस्थितीत चालविण्याच्या अनुषंगाने तांत्रिक मनुष्यबळाची आवश्यकता आहे. सदर तांत्रिक मनुष्यबळ तात्काळ उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने RFP एका महिन्यात तयार करुन पुढील कार्यवाही करण्यात यावी,असे निर्देश कार्यबल गटाला देण्यात आले. त्याचप्रमाणे, तिनही टप्प्यांमध्ये सर्व जिल्ह्यांमध्ये उभारण्यात आलेल्या सेंटरचे सीईटी परीक्षाचा कालावधी सोडुन उर्वरीत कालावधीत सुयोग्य पध्दीने इतर विभागांच्या वेगवेगळ्या परीक्षांकरिता उपयोग करण्याच्या दृष्टीने नियोजन करावे. परीक्षा घेण्याऱ्या एजंसींना संपर्क करुन याठिकाणी असणाऱ्या संगणकांची व इतर पायाभूत सुविधांची माहिती द्यावी व यातुन शासनाला महसुल कशाप्रकारे मिळेल या अनुषंगाने एक मॉडेल तयार करण्यात यावे. याबाबतची कार्यवाही कार्यबल गटामार्फत करण्यात यावी.

**6) Mock Test :-**

सीईटी परीक्षा सुरळीतपणे देण्याकरिता विद्यार्थ्यांना सरावाकरिता ०६ Mock Test ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यातील ०३ Mock Test ची सुविधा विद्यार्थ्यांना निशुल्क पणे उपलब्ध करुन देण्यात यावी व पुढील ०३ Mock Test ची सुविधा विद्यार्थ्यांना सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी, असे निर्देश मा. मंत्री महोदयांनी कार्यबल गटाला दिले.

**7) CET 2026 :-**

सीईटी परीक्षा २०२६ ही वर्षातुन ०२ वेळा घेण्याचे शासनाने जाहीर केले असुन प्रथम टप्पा मार्च व एप्रिल, २०२६ मध्ये घेण्याचे प्रस्तावीत आहे. अशा परिस्थितीत कोणती एजंसी ही परीक्षा घेणार याबाबत स्पष्ट कार्यादेश दिले नसल्याने मा. मंत्री महोदयांनी नाराजी व्यक्त केली. पुढील ०८ दिवसांत याबाबतची प्रक्रिया आपल्या स्तरावरुन राबविण्याबाबत आयुक्त, सी.ई.टी. सेल यांना निर्देश देण्यात आले.

**8) CET 2027 :-**

सीईटी परीक्षा २०२७ ही वर्षातुन ०२ वेळा घेण्याचे शासनाने जाहीर केले असुन प्रथम टप्पा

एजंसीचा करार संपुष्टात आल्याने सीईटी परीक्षा २०२७ करिता याबाबतची RFP एका महिन्यात तयार करुन जाहीर करण्याचे निर्देश कार्यबल गटाला देण्यात आले.

**9) CET उपकेंद्र :-**

राज्य सामाईक परीक्षा कक्षाचे सर्व जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी ०१ याप्रमाणे एकुण ३६ उपकेंद्र सुरु करणे प्रस्तावीत आहे. या उपकेंद्रांमध्ये विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसंबंधी येणाऱ्या अडचणींच्या अनुषंगाने शिष्यवृत्ती हेल्प डेस्क देखील तयार करण्यात यावेत, असे निर्देश कार्यबल गटाला देण्यात आले.

**10)** BBA/BCA अभ्यासक्रमाकरिता यापुढे PCM चे गुण ग्राह्य धरण्यात यावेत व त्याकरिता आवश्यक ती कार्यवाही आयुक्त, सीईटी यांनी करावी असे निर्देश बैठकीत देण्यात आले.

सर्व उपस्थितांचे आभार माणून बैठक संपल्याचे जाहीर केले.

****